रयत शिक्षण संस्थेचे

# दहिवडी कॉलेज दहिवडी

ता. माण.जि.सातारा

## ग्रंथप्रदर्शन अहवाल

दि.१०/०२/२०१८

दहिवडी कॉलेज दहिवडी येथे दि.१०/०२/२०१८ रोजी जिमखाना डे निमित्ताने एक दिवशीय ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महात्मा गांधी महाविद्यालय दहिवडी येथील मा. प्राचार्य पवार.पी.एस यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बी.टी जाधव उपस्थित होते.तसेच माण तालुक्याचे एपीआय अधिकारी मा.पाटील साहेब, माजी विध्यार्थी संघाचे अध्यक्ष मा, नंदकुमार खोत, मा.हेमंत कुलकर्णी,माजी प्राध्यापक प्रा.आर.डी जाधव व इतर मान्यवर उपस्थित होते.

या ग्रंथ प्रदर्शनामध्ये वेगवेगळ्या विषयाचे एकूण ६४० ग्रंथ वाचकासाठी ठेवण्यात आले होते. या ग्रंथ प्रदर्शनामध्ये दहिवडी महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक व विध्यार्थी यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. या ग्रंथ प्रदर्शनामधून वाचकांना नवीन ग्रंथांची माहिती मिळाली

सदरचे ग्रंथ प्रदर्शन मा. प्राचार्य डॉ.बी.टी.जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली व ग्रंथालय समितीचे चेअरमन व सदस्य तसेच ग्रंथालयातील व महाविद्यालयातील सेवक यांच्या सहकार्याने ग्रंथ प्रदर्शन यशस्वी करण्यात आला.

ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण. जि. सातारा.

DAHIWADI COLLEGE, DAHIWADI
LIBRARY
TAL.MAN,DIST SATARA

रयत शिक्षण संस्थेचे

# दहिवडी कॉलेज दहिवडी

ता.माण, जिल्हा सातारा

## ग्रंथालय विभाग आणि भाषा विभाग

## ग्रंथप्रदर्शन अहवाल २२-२३

दहिवडी कॉलेज मधील ग्रंथालय विभाग आणि भाषा विभाग यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या सांस्कृतिक हॉलमध्ये " स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव " निमित्ताने दिनांक १७.८.२०२२ रोजी सकाळी १०.३० वाजता रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आणि महाविद्यालय विकास समितीचे सदस्य आद. श्री. प्रदीपकुमार शिंदे यांचे हस्ते व महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज दहिवडीचे आद.मुख्याध्यापक श्री.बी.एस.खाडे यांचे उपस्थितीत ग्रंथ प्रदर्शन उद्घाटन झाले.

याप्रसंगी श्री.प्रदीपकुमार शिंदे यांनी विद्यार्थींना पुस्तके वाचनासाठी प्रोत्साहन दिले तर श्री.बी. एस. खाडे यांनी शिक्षण घेत असताना वाचन हे महत्त्वाचे असून भावी आयुष्यात याचा नक्कीच फायदा होतो असे सांगितले. महाविद्यालयाचे उप प्राचार्य डॉ.बी. एस. बलवंत यांनी मान्यवरांचे स्वागत करून विद्यार्थींनी या प्रदर्शनाचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे सांगितले.

हा कार्यक्रम घेण्यासाठी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एस टी.साळुंखे साहेब यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभाग प्रमुख श्री. विष्णू वाघेरे यांनी केले व आभार प्रदर्शन मराठी विभाग प्रमुख डॉ.मीरा देठे यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. के.एस.शिंदे ,आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ.ए.एन. दडस, राज्यशास्त्र विभागातील प्रा. डी.एस. मांजरे , डॉ ए.एन.देडे, प्रा. एस.डी.भाकरे , प्रा. प्रकाश जमदाडे, श्री.ए.पी. रोमन उपस्थित होते व हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालायातील श्री.राहुल गलांडे,श्री सुशांत गुजर, श्रीमती सविता खराडे, कुमारी सुवर्णा मोहिते यांनी परिश्रम घेतले. हे ग्रंथ प्रदर्शन पाहण्यासाठी महाविद्यालयातील सिनिअर विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी प्रदर्शन पाहून आपला अभिप्राय नोंदवला.

DAHIWADI COLLEGE, DAHIWADI
LIBRARY
TAL.MAN, DIST.SATARA

मराठी विभाग प्रमुख
दहिवडी कॉलेज दहिवडी
ता. माण, जि. सातारा

ग्रंथपाल
दहिवडी कॉलेज, दहिवडी
ता. माण, जि. सातारा.

PRINCIPAL
DAHIWADI COLLEGE, DAHIWADI
TAL. MAN, DIST. SATARA.